ePaper

# शेतकऱ्यांना सरकारचा दिलासा; शेतकऱ्यांना 755 कोटींची मदत



| वर्ष - 6 । अंक - 169 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

नवरात्रौत्सव
आजचा रंग
हिरवा



www.mahaenews.com | ।शुक्रवार।दिनांक 30सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## नैसर्गिक नाल्याद्वारे नदी पात्राला जाणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया

# इंद्रायणी नदी संवर्धनासाठी प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'!

## कुदळवाडी येथे महापालिका प्रशासनाचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प

**।पिंपरी।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**इंद्रायणी नदी संवर्धनाच्याद्दष्टीने पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली असून, नाल्यांद्वारे थेट नदीपात्रात मिसळणाऱ्या सांडपाण्यावर आता प्रक्रिया केली जाणार आहे. त्यासाठी कुदळवाडी येथील नैसर्गिक नाल्याजवळ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला असून, लवकरच कार्यान्वयीत होणार आहे.**

चिखली, तळवडे आदी भागांमध्ये औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या भागातील औद्योगिक कंपन्यांमधून निर्माण होणारे रसायणमिश्रीत सांडपाणी कुदळवाडीतून जाणाऱ्या नैसर्गिक नाल्यात सोडले जाते. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे तक्रारीही करण्यात आली आहे. संबंधित कंपन्यांकडून महापालिका कर वसुली करते. त्याठिकाणी पायाभूत सुविधा देणे, ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

दरम्यान, राष्टीय हरित लवादाने महापालिका प्रशासनाने नैसर्गिक नाल्यांद्वारे नदी पात्रात मिसळणाऱ्या सांडपाण्यावर काय उपाययोजना करणार? असा सवाल उपस्थित केला होता. त्यावर महापालिका



**नैसर्गिक नाल्याच्या मूळ प्रवाहाला अडथळा न करता अतिक्रमण हटवून उपलब्ध झालेल्या जागेत प्रकल्पाचे काम सुरू आहे. कुदळवाडी येथील नाल्यातून इंद्रायणी नदीपात्रात मिसळणारे रसायणमिश्रीत पाणी पुढे तीर्थक्षेत्र आळंदीपर्यंत जाते. नदीचे संवर्धन व्हावे आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करता यावी. याकरिता राष्ट्रीय हरित लवाद आणि प्रदूषण नियंत्रण महमंडळाच्या निर्देशानुसार प्रशासन काम करीत आहे. निर्धारित वेळत प्रकल्प कार्यान्वयीत करण्याचा आमचा संकल्प आहे.**

**- संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता.**

### प्रकल्पासाठी अतिक्रमण हटवले...

राष्ट्रीय हरित लवाद आणि प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या निर्देशानुसार, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाने कुदळवाडी येथील नैसर्गिक नाल्यावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले. हा प्रकल्प नैसर्गिक नाल्याजवळ उभारण्याचे निश्चित करण्यात आले. मात्र, त्याठिकाणी बेकायदा बांधकाम करण्यात आले होते. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकारी यांनी सामोपचाराने अतिक्रमण काढून घेतले. त्यामुळे मोकळ्या झालेल्या जागेवर प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. विशेष म्हणजे, अनधिकृत बांधकामांमुळे नैसर्गिक नाला बुजवला जात होता. मात्र, प्रशासनाच्या सतर्कतेमुळे नाल्याचा मूळ प्रवाह कायम राहीला असून, सांडपाण्यावर प्रक्रिया प्रकल्पही उभारण्याचे काम सुरू झाले आहे. याबाबत पर्यावरण प्रेमींकडून समाधान व्यक्त होत आहे.

प्रशासनाकडून ज्या नाल्यांमधून सांडपाणी नदी पात्रात जाते. त्याठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येतील, असे कळवले होते. तसेच, प्रदूषण नियंत्रण महामंडळानेही सांडपाणी थेटपणे नदी पात्रात न सोडता प्रक्रिया करावी, असे सूचवले आहे.

# चिखलीत अवैधरित्या वृक्षतोड, महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष!

## मागील काही दिवसांपासून पिंपरी चिंचवड शहरात बिनदिक्कतपणे होतेय वृक्षतोड

**। पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

चिखलीतील सेक्टर नंबर-18 शिवतेजनगर ( खदान ) परिसरामध्ये विनापरवाना अवैधरित्या तब्बल 40 झाडांची वृक्षतोड करून त्यांची सर्रास वाहतूक सुरु आहे. या झाडांमध्ये प्रामुख्याने आंबा, सागवान, लिंब, बाभूळ, पिंपळ, वडाची अशा जुन्या प्रजातीची झाडे आहेत. मागील काही दिवसांपासून पिंपरी चिंचवड शहरात बिनदिक्कतपणे वृक्षतोड करत आहेत. यावर प्रशासन काही ठोस पावले उचलतांना दिसत नाही. नागरिकांना झाडे हे ऑक्सिजन देऊन जीवदान देण्याचे काम करतात मात्र त्याच झाडांची कत्तल करून त्यांचा जीव जातोय आणि प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

काही दिवसांपूर्वी फॉर्मायका कंपनीतील अवैध वृक्षतोडीबाबतचा असाच एक प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर कंपनी मालकाला 45 लाखाचा दंड थोटवण्यात आला.हे प्रकरण ताजे असतानाच चिंचवड मध्ये अशा प्रकारेच मोठ्या प्रमाणावर वृक्षांच्या कत्तली करून त्यांची वाहतूक व विक्री करण्यात



येत आहे. सेक्टर नं-18 ओयो सिल्व्हर की हॉटेल शिवतेजनगर चिखली प्राधिकरण ,चिंचवड ( खदान ) याठिकाणी असलेल्या शेकडो झाडांची विनापरवाना कत्तल करण्यात आलेली आहे.

**काही दिवसांपूर्वी फॉर्मायका कंपनीतील अवैध वृक्षतोडीबाबतचा असाच एक प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर कंपनी मालकाला 45 लाखाचा दंड थोटवण्यात आला.हे प्रकरण ताजे असतानाच चिंचवड मध्ये अशा प्रकारेच मोठ्या प्रमाणावर वृक्षांच्या कत्तली करून त्यांची वाहतूक व विक्री करण्यात येत आहे. सेक्टर नं-18 ओयो सिल्व्हर की हॉटेल शिवतेजनगर चिखली प्राधिकरण ,चिचंवड ( खदान ) याठिकाणी असलेल्या शेकडो झाडांची विनापरवाना कत्तल करण्यात आलेली आहे.**

उद्यान विभागाच्या दुर्लक्षामुळे ठेकेदारांकडून येथील वृक्षांची मोठ्या प्रमाणवर वृक्षतोड चालू आहे. एकीकडे शासनस्तरावर वृक्ष लागवडीचे संवर्धनाचे उपक्रम सुरु असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून वृक्षतोड दुर्लक्ष केले जात आहे. संबंधितांनी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 कलम ८(१) चे उल्लंघन केले आहे. वृक्षतोड करून संबंधितांनी पर्यावरणाची मोठी हानी केली आहे.त्यामुळे या ठिकाणचे जागा मालक , वृक्षतोड करणारे व वृक्षांची वाहतूक करून विक्री करणारे व ते वृक्ष विकत घेणारे वखारीचे मालक या सर्वांची सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करावेत . तसेच महापालिकेच्या उद्यान विभागाकडून तात्काळ या ठिकाणच्या वृक्षतोडीचा पंचनामा करून तात्काळ कारवाई करण्यात यावी.अशी मागणी अपना वतन संघटनेचे अध्यक्ष सिद्दीकभाई शेख यांनी पिंपरी चिंचवड पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज दिला आहे.

## शॉर्ट न्यूज

### चार हजार हेक्टरवरील केळींचे नुकसान

।पुणे। महाईन्यूज ।

कुकुंबर मोझॅक (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील सुमारे चार हजार हेक्टरवरील केळी बागांचे नुकसान झाले आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात लागवड केलेल्या केळी रोपांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे. मोठ्या प्रमाणावरील नुकसानीमुळे पुढील वर्षी गणेशोत्सव आणि नवरात्रात केळींचा काही प्रमाणात तुटवडा जाणवणार आहे. जळगाव जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संभाजी ठाकूर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात प्रामुख्याने रावेर, यावल या तालुक्यात कुकुंबर मोझॅक या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून आला आहे. कृषी विभागाने केलेल्या पाहणीत ३८०० हेक्टरवरील नव्याने लागण केलेल्या रोपांवर रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. कुकुंबर मोझॅकचे विषाणू केळीसह सुमारे नऊशे वनस्पतींवर जिवंत राहू शकतात. शेतकरी रोपांची लागण केली,की आंतरपीक म्हणून भाजीपाल्याची लागवड करतात. या भाजीपाल्यामुळे विषाणूचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होतो. शिवाय एकदा प्रादुर्भाव होऊन रोप पिवळे पडले की, ते उपटून टाकून नष्ट करावे लागते. शेतकरी महागड्या औषधांची फवारणी करतात, खतांची मात्रा देतात, तरीही ते रोप विषाणुमुक्त होत नाही, उलट विषाणूचा प्रसार वेगाने करते

# पुण्यात मुसळधारा, शहर पुन्हा तुंबले!

।पुणे। महाईन्यूज ।

**पुणे शहरात गुरुवारी (२९ सप्टेंबर) संध्याकाळी ढगांच्या गडगडाटासह सुमारे अर्धा तास झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील रस्ते पुन्हा तुंबले. सर्वच प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले होते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली. संध्याकाळी कार्यालये सुटण्याच्या वेळेलाच पाऊस झाल्याने घराबाहेर असलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. शहर आणि परिसरात पुढील दोन ते तीन दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता कायम असल्याचा अंदाज पुणे वेधशाळेकडून देण्यात आला आहे.**



शहरात सकाळपासून कधी अंशत: ढगाळ, तर कधी निरभ्र आकाशाची स्थिती होती. गुरुवारी पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यातील काही भागात ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार दुपारीच काही भागांत हलक्या पावसाने हजेरी लावली होती. पिंपरी-चिंचवड शहरात दुपारी तीनच्या सुमारास काही भागात पाऊस झाला. पुणे शहर आणि परिसरासर संध्याकाळी साडेचारनंतर आकाशात मोठ्या प्रमाणावर ढग जमा झाले. संध्याकाळी सव्वापाचच्या सुमारासा ढगांच्या गडगडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला पावसाचा जोर मोठा होता.

**रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले होते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली.**

शहरात सकाळपासून कधी अंशत: ढगाळ, तर कधी निरभ्र आकाशाची स्थिती होती. गुरुवारी पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यातील काही भागात ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार दुपारीच काही भागांत हलक्या पावसाने हजेरी लावली होती. पिंपरी-चिंचवड शहरात दुपारी तीनच्या सुमारास काही भागात पाऊस झाला. पुणे शहर आणि परिसरासर संध्याकाळी साडेचारनंतर आकाशात मोठ्या प्रमाणावर ढग जमा झाले. संध्याकाळी सव्वापाचच्या सुमारासा ढगांच्या गडगडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला पावसाचा जोर मोठा होता. सहाच्या सुमारास पाऊस ओसरला, पण तोवर शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी जमा झाले होते. त्यातून मार्ग काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत होती. त्यामुळे वाहतुकीची गती कमी झाल्याने काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.

# 'स्वच्छता' हा देखील एक उत्सव व्हावा!

## चंद्रकात पाटील : ' नमो करंडक'मध्ये सहभागी व्हा

।पुणे। महाईन्यूज ।

गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सवांप्रमाणे 'स्वच्छता' हा देखील एक उत्सव व्हावा, या हेतूने पुण्यातील भारतीय जनता पक्ष आणि गिरीश खत्री मित्रपरिवाराच्या वतीने 'नमो करंडक स्पर्धा – २०२२' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, या स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला असून, प्रामुख्याने सोसायटी आणि अपार्टमेंटच्या स्वच्छतेवर अधिक भर दिला जाणार आहे. स्पर्धेचे यंदा दुसरे वर्ष आहे.

दरम्यान, या स्पर्धेला आता मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुभेच्छा





दिल्या आहेत. ते म्हणाले, या स्पर्धेत सर्व सोसायटी आणि अपार्टमेंटने भाग घ्यावा. स्वच्छतेच्या या उत्सवात सर्वांनी मोठ्याप्रमाणात सहभागी व्हावे. गणेशोत्सव आणि नवरात्र उत्सवांप्रमाणे 'स्वच्छता' हा देखील एक उत्सव व्हावा, स्वच्छता ही कायम करत राहण्याची प्रक्रिया आहे. यामुळे मी सर्व संस्था, सोसायट्या आणि अपार्टमेंटसना विनंती करतो की, हा नमो करंडक जिंकण्याच्या निमित्ताने एक चुरस निर्माण होऊ द्या आणि त्यातून सर्व अपार्टमेंट आणि सोसायट्या स्वच्छ होऊ द्या. गेल्या वर्षी मी या कार्यक्रमाला उपस्थित होतो. त्यावेळी मला खूप आनंद झाला. खूप हिरहिरीने यात लोकांनी सहभाग घेतला. याही वर्षी असाच प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा करतो असं पाटील यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मागच्या वर्षी या स्पर्धेत एकूण ४२ सोसायटीनीं सहभाग नोंदवत, अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला होता. स्पर्धेदरम्यान सोसायटी मध्ये जे स्वच्छता कर्मचारी आहेत त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी पुरुष कर्मचाऱ्यांना ड्रेस' चे साहित्य तर महिला कर्मचाऱ्यांना पैठणी देण्यात आली होती. आता या स्पर्धेची सोसायटी सोबत स्वच्छता कर्मचाऱ्यांनाही चांगलीच उत्सुकता लागली आहे.

# हिंदू समाजाची छगन भुजबळ यांनी माफी मागावी; भाजपची मागणी

।पुणे। महाईन्यूज ।

सरस्वती देवीच्या प्रतिमा शाळेत कशासाठी, असे विधान करून नवरात्रीच्या सणात हिंदूंच्या धार्मिक भावना दुखाविल्या प्रकरणी राष्ट्रवादीचे माजी मंत्री छगन भुजबळ यांनी तातडीने माफी मागावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाने केली आहे. माजी मंत्री छगन भुजबळ यांनी माफी न मागितल्यास भाजपच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा भाजपा शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वादग्रस्त विधानाचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने तांबडी जोगेश्वरी मंदिरासमोर आंदोलन करण्यात आले. या वेळी मुळीक बोलत होते.



सरचिटणीस गणेश घोष, राजेश येनपुरे, संदीप लोणकर, दत्ता खाडे, दीपक पोटे, प्रमोद कोंढरे, रवींद्र साळगावकर, सचिन मोरे यांच्यासह कार्यकर्ते आणि पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. सत्ता परिवर्तन झाल्यानंतर महाविकास आघाडीचे नेते सैरभैर झाले आहेत. विकासकामांची कोणतीच दूरदृष्टी नसल्याने वैफल्यग्रस्त अवस्थेत काही मंडळी बेताल वक्तव्य करीत आहेत. हिंदुत्वाशी फारकत घेतलेल्या शिल्लक सेनेने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे या वेळी जगदीश मुळीक यांनी सांगितले.

# जीआयएस प्रकल्पांतर्गत नागरिकांना विविध सेवा मिळणार!

## प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह, शहर सल्लागार समितीची अकरावी बैठक उत्साहात

पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका अंतर्गत येणा-या सर्व मालमत्तांचे जी.आय.एस. (भौगोलिक माहिती प्रणाली) सर्वेक्षण स्मार्ट सिटी मार्फत हाती घेण्यात आले आहे. जी.आय.एस.प्रणालीद्वारे महानगरपालिका क्षेत्रामधील मिळकतीसाठी सुधारीत सेवा, संसाधनांचे सुधारित नियोजन, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, पारदर्शक प्रशासन, आपत्कालीन व्यवस्थापन करण्यास मदत होणार असून विविध सॉफ्टवेअर विकसीत करून त्याद्वारे लोकोपयोगी ३५ सेवा पुरविण्यात येणार आहे, अशी माहिती प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**



स्मार्ट सिटी प्रकल्प कामकाजाचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी शहर सल्लागार समितीची अकरावी बैठक ऑनलाईन पार पडली. प्रसंगी, पॅन सिटी व एबीडी प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या प्रगतीबाबत सल्लागारांमार्फत सादरीकरण करण्यात आले. यावेळी, आमदार लक्ष्मण जगताप (प्रतिनिधी), जिल्हाधिकारी राजेश देशमुख (प्रतिनिधी), अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे- पाटील, सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, मुख्य वित्तीय अधिकारी सुनील भोसले, जनरल मॅनेजर (इन्फ्रास्ट्रक्चर) अशोक भालकर, कंपनी सेक्रेटरी चित्रा पंवार, कार्यकारी अभियंता मनोज सेठीय, सहा. मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मीकांत कोल्हे, टेक्निकल एक्सपर्ट डॉ. प्रताप रावळ, युवक प्रतिनिधी अमित तलाठी, विद्यार्थी प्रतिनिधी दिपक पवार, सिटीझन फोरमचे तुषार शिंदे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

स्मार्ट सारथी ऍपच्या माध्यमातून १ लाख ८५ हजार नागरिकांपर्यंत पोहोचता आले आहे. तसेच, विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे कॅम्पनींग सुरु आहे.

मर्चंड मोडयुल ऍपद्वारे शहरातील छोट्या व्यापा-यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. म्युनिसीपल ई-क्लासचे ८० टक्के काम झालेले आहे. डोर टू डोर सर्व्हे सुरु आहे. कंट्रोल ऍन्ड कमांड सेंटरचे काम प्रगतीपथावर आहे. एबीडी प्रकल्पांतर्गत रस्त्यांचे ८५ टक्के काम मार्गी लागले आहे. स्मार्ट बस स्टॉप उभारले जात आहेत.

स्मार्ट पार्कींग व्यवस्था, सिनिअर सिटीझन प्लाझा, योगा पार्कची कामे देखील प्रगतीवर आहेत. ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यात आली आहे. वायफाय बसविण्यात आले आहे. पोल उभारण्याचे काम पूर्ण झालेले आहे. सिटी सर्व्हेलन्स अंतर्गत शहरात नेमून दिलेल्या जागेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. स्मार्ट ट्राफिकचे कॅमेरे बसविले असून व्हीएमडी, किओक्स, स्मार्ट पर्यावरण मशीन, स्मार्ट वॉटर मीटर, स्मार्ट सेव्हरेज, सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट आदी स्मार्ट सिटी अंतर्गत सूरू असलेल्या प्रकल्पाची कामे वेगाने सुरु आहे.

### मुंबईहून येणाऱ्या वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग...

ऑप्टीकल फायबर केबल आणि विविध स्मार्ट एलिमेंटमधून भविष्यात स्मार्ट सिटीला उत्पन्न मिळण्यासाठी निविदा प्रक्रिया सद्यस्थितीत राबविली जात असल्याची माहिती यावेळी सल्लागार प्रतिनिधींनी दिली. याबाबत प्रशासक शेखर सिंह म्हणाले की, जीआयएस प्रकल्पांतर्गत २ लाख ३२ हजार मालमत्तांचा सर्व्हे पूर्ण करण्यात आला आहे. तसेच, लिडार (LIDAR) यंत्राद्वारे ९७ टक्के सर्व्हे झाला आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मनपाच्या संबंधित विभागांचा सहभाग करून घेण्यात येत असून नागरिकांसाठी प्रकल्प खुली करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी, विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# ओला कचरा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आवारात टाकू !

## सोसायटी फेडरेशनचा इशारा : उपायुक्त अजय चारठाणकर यांच्यासोबत बैठक

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड** महानगर पालिकेने पिंपरी चिंचवड शहरातील मोठ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचा ओला कचरा 2 ऑक्टोबर पासून न उचलण्याचा निर्णय घेऊन, ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था प्रतिदिन 100 किलो कचरा निर्माण करतात त्यांना नोटिसा दिलेल्या होत्या. या नोटिसा आल्यानंतर पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्यांना विश्वासात न घेता घेतलेल्या निर्णयामुळे चिखली-मोशी पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनने पिंपरी चिंचवड मनपाचे आयुक्त श्री. शेखर सिंग यांना पत्रव्यवहार करून पिं.चि. मनपाने जर ओला कचरा उचलणे बंद केले तर हा सर्व ओला कचरा पिंपरी चिंचवड मनपाच्या गेटवर आणून टाकण्याची आक्रमक भूमिका घेतली होती. सोसायटी फेडरेशनच्या या आक्रमक भूमिकेनंतर पिंपरी चिंचवड मनपाचे उपआयुक्त अजय चारठाणकर



यांनी चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांच्या बरोबर बैठक घेतली.

या बैठकीमध्ये पिं.चिं. मनपाचे उपआयुक्त अजय चारठाणकर यांनी सकरात्मक भूमिका घेऊन सोसायटीधारकांच्या सर्व अडचणी समजून घेतल्या जातील व कोणतीही जबरदस्ती किंवा हटवादी भूमिका न घेता सोसायटीधारक व पिं.चिं. मनपा प्रशासन यांच्या समन्वयाने यावर तोडगा काढून याची अंलबजावणी केली जाईल असे अश्वासन दिले.

1) 2016 नंतरच्या मोठ्या प्रमाणात ओला कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्यांच्यासाठी पहिला टप्पा

2) 2016 च्या अगोदरच्या मोठ्या प्रमाणात ओला कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या दुसरा टप्पा

3) दैनंदिन 100 किलो पेक्षा कमी कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या तिसरा टप्पा

या तीन ही टप्यामध्ये हे अभियान राबविताना सोसायट्यांना ज्या काही अडचणी आहेत त्या समजून घेतल्या जातील. हौसिंग सोसायटी फेडरेशन आणि पिं.चिं. मनपा यांच्या समन्वयातून त्यावर योग्य तोडगा काढला जाईल. तोडगा निघेपर्यंत जबरदस्ती केली जाणार नाही. यावर मार्ग व तोडगा काढण्यासाठी 9 किंवा 10 ऑक्टोबरला पिंपरी चिंचवड मनपा तर्फे शहरातील मोठ्या सोसायट्यांचे पदाधिकारी व सोसायटी फेडरेशन पदाधिकारी यांची कार्यशाळा घेतली जाईल. त्यामध्ये या सोसायट्यांच्या सर्व अडीअडचणी समजून घेऊन त्यावर उपाय शोधले जातील. हौसिंग फेडरेशनच्या मागणीप्रमाणे इंदोर शहराच्या धर्तीवर पिं.चिं.शहरात देखील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून तो जिरवण्याच्या युनिट बाबत तपासणी केली जाईल. आणि शक्य असल्यास ते उभारण्यात येतील.

**“ 2016 नंतरच्या मोठ्या गृहप्रकल्पात विकसकांनी ओला कचरा हा गृहप्रकल्पात जिरवण्याचे प्रकल्प करून देणे अनिवार्य असताना ते करून न दिल्याने बिल्डरवर नियमभंग केला म्हणून कारवाई करणे , तसेच पिं.चिं.मनपाच्या ज्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अशा गृहप्रकल्पास बांधकाम पूर्णत्वाचे दाखले दिले यांच्यावर कारवाई करण्याची फेडरेशनने जी मागणी केली आहे. हे माझ्या अधिकार कक्षेत येत नाही. या सर्व गोष्टी माननीय आयुक्त साहेबांच्या अधिकारात येतात. फेडरेशनने यासाठी माननीय आयुक्त साहेबांच्या कडे पाठपूरावा करावा. माझे काम हे अभियान सोसायटीधारकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना सहकार्य करून हे अभियान यशस्वीपणे राबवणे हे आहे**

- **अजय चारठाणकर,** उपायुक्त, पिं.चिं. मनपा.

**“ जो पर्यंत 2016 नंतरच्या मोठ्या गृहप्रकल्पामध्ये ज्या विकसकानी नियम धाब्यावर बसवून ओला कचरा सोसायट्यांमध्ये जिरवण्याचे प्रकल्प उभारून दिलेले नाहीत त्यांच्यावर त्यांनी नियम भंग केला म्हणून कारवाई होत नाही, तसेच पिं.चिं. मनपाच्या बांधकाम विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी अशा गृहप्रकल्पाना बांधकाम पूर्णत्वाचे दाखले दिलेले आहेत त्यांच्यावर कारवाई होत नाही. व सोसायट्यांच्या सर्व अडचणी दूर होत नाहीत, तोपर्यंत सोसायट्यातील कचरा उचलणे बंद करू नये.अन्यथा पिं.चिं.मनपास सोसायटी धारकांच्या रोषास सामोरे जावे लागेल.**

- **संजीवन सांगळे,** अध्यक्ष -चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन

**“ पिंपरी चिंचवड शहरातील सर्व लोकप्रतिनिधी माननीय 3 आमदार व दोन खासदार व सोसायटी फेडरेशन प्रतिनिधी यांची संयुक्त मिटिंग होऊन यावर योग्य तोडगा निघत नाही तोपर्यंत सोसायट्यांच्या कचरा उचलणे बंद करू नये ही विनंती. अन्यथा हा सर्व ओला कचरा पिं.चिं. मनपाच्या गेटवर आणून टाकला जाईल.**

**- संजय गोरड, संघटक -चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन.**

**“ शहराचा लोकप्रतिनिधी म्हणून या सर्व सोसायट्यांमध्ये राहणारे नागरिक शेवटी यांच्या या सर्व ओल्या कचऱ्याबाबतच्या समस्या घेऊन आमच्याकडे येतील व पिं. चि. मनपा प्रशासन, सोसायटीधारक व लोकप्रतिनिधी यांच्यात संघर्ष होऊन शहराचे वातवरण खराब होईल.त्यामुळे यावर सामंजस्याने तोडगा निघेपर्यंत सोसायट्यांचा ओला कचरा उचलणे बंद करू नये - नितीनआप्पा काळजे, माजी महापौर -पिं. चिं. मनपा.**

## संपादकीय

# ओसंडून वाहणारा आशावाद

***स्वातंत्र्यदिनी पंतप्रधानांनी केलेल्या भाषणाचे खरे तर विश्लेषण करणे अयोग्य. कारण त्यातून आशावाद ओसंडून वाहत असतो आणि आनंदाने ओसंडणाऱ्या आशावादाची मोजमापे काढणे अन्यायकारकच. त्यात यंदा तर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव.***

त्यामुळे तर विश्लेषण आणि विच्छेदन अगदीच अयोग्य. या अमृतकालीन आशावादाच्या कंपनलहरी मोजूमापू नयेत अशाच. तथापि या भाषणात पंतप्रधानांनी कालबद्ध विधान केले असल्याने त्याचे मापन आणि तदनुषंगिक मोजमाप करणे क्रमप्राप्त ठरते. पंतप्रधानांचे हे विधान देश विकसित होण्याबाबत आहे. भारतीय स्वातंत्र्याची शताब्दी होईल तोपर्यंत, म्हणजे २०४७ पर्यंत, देशाचे वर्गीकरण 'विकसनशील'तेतून 'विकसित' गटात झालेले असेल, असा त्यांच्या म्हणण्याचा सूर. म्हणजे या मार्गक्रमणासाठी आपल्या हाती जेमतेम २५ वर्षे आहेत. तेव्हा काळ-काम-वेग यांचे त्राशिक मांडून या साध्यप्राप्तीसाठी नक्की काय करावे लागेल याचा अंदाज बांधता येईल. वास्तविक यंदाचे वर्ष खरे तर पंतप्रधानांनी काही वर्षांपूर्वी ठेवलेल्या लक्ष्यपूर्तीचे. विद्यमान २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल अशी घोषणा पंतप्रधानांनी केली होती. त्या घोषणेबरहुकूम घटना घडल्या नसाव्यात. अन्यथा उद्दिष्टपूर्ती दणक्यात साजरी केली गेली असती. पण तसे काही होताना दिसत नाही, याचा अर्थ सुज्ञांनी समजून घेतलेला बरा. आगामी २५ वर्षांच्या साध्याची चर्चा करण्याआधी या वास्तवाची जाणीव असणे आवश्यक. त्यामुळे काही एक समान पार्श्वभूमी तयार होते. त्यानंतर आता विकसनशील ते विकसित या टप्प्याचा आढावा घेता येईल.

यातील पहिले आव्हान म्हणजे अर्थातच एकंदर अर्थव्यवस्था आणि दरडोई उत्पन्न यांचे. या दोन्हींत पुढील २५ वर्षांत किती वाढ व्हायला हवी, याची काही गोळाबेरीज यानिमित्ताने करता येईल. सध्या आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार आहे जेमतेम ३.१ लाख कोटी डॉलर इतका. आपल्या शेजारील चीनची अर्थव्यवस्था आकाराने तीनपट मोठी आहे आणि अमेरिकेची दहापट. 'पर्चेसिंग पॉवर पॅरिटी'च्या (नागरिकांस जीवनावश्यक काही समान घटकांच्या खरेदीसाठी त्या त्या देशात किती पैसे लागतात याचा ठोकताळा म्हणजे पीपीपी) निकषानुसार मोजू गेल्यास भारताचे दरडोई वर्षिक उत्पन्न साधारण ६.५ ते ७ हजार डॉलर्सच्या घरात आहे. म्हणजे चीनच्या तुलनेत निम्म्याहून कमी. काही विकसित देशांत हेच उत्पन्न आपल्या दहापट अधिक आहे आणि श्रीमंत देशांबाबत तर तुलनादेखील करणे अन्याय्य ठरेल इतके ते अधिक आहे. 'मानवी विकास निर्देशांक' (ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स) हा आणखी एक देशांची प्रगती मोजण्याचा मापदंड. प्रत्येक देशातील नागरिकांस उपलब्ध असलेल्या विकाससंधी, दरडोई गुंतवणूक आदी अनेक घटकांनी हा निर्देशांक मोजला जातो. या निर्देशांकानुसार १८९ देशांच्या रांगेत आपले स्थान १३१ वे आहे.



## आनंदी सकाळ

# कबीरांचा कठोरपणे सत्याचा आविष्कार

कबीर क्रांतिकारी संत होते. आपण अनुभवलेला दिव्य आनंद ते इतरांनाही वाटत असत. निर्भय कबीरांनी कठोरपणे सत्याचा आविष्कार करताना इतरांना काय वाटेल, याची भीड बाळगली नाही. सत्याविरुद्ध जे जे आढळले, त्याचे खंडन करताना त्यांनी कडक भाषा वापरली. धर्ममार्तंड कबीरांविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले. त्यांचा छळ करण्यासाठी सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा, पांडित्य सर्व काही पणाला लावले. त्यांच्यावर बहिष्कार टाकला, उपासमार केली, धमक्या दिल्या, मारहाण केली. सर्वांभूती राम पाहणारे कबीर शांतिब्रह्म होते. कितीही विरोध झाला, तरी त्यांची चित्तवृत्ती शांत व प्रसन्नच राहिली. दुष्टांनी कबीरांना छळाबळाने नष्ट करण्याचा प्रयत्न केला. काशीमध्ये त्यांना गंगेत साखळदंडांनी बांधून फेकून दिले. आश्चर्य असे, की साखळदंड तुटले आणि कबीर सुखरूप किनाऱ्याला लागले. छळ करणाऱ्यांना वाटले, कबीरांना चेटुकबिटुक येत असले पाहिजे, म्हणून हा असे चमत्कार करतो.




# ध्वनिप्रदूषणाविरोधातील लढाई



झऱ्याची झुळझुळ, पक्ष्यांचा कलरव, मंद आवाजातले संगीत हे सर्व आपल्याला हवेहवेसे वाटते. तेच डीजेची धडाडधूम असेल, तर आपल्याला कानात बोटे घालावीशी वाटतात. या धडाडधूम आवाजाने चांगल्या तब्येतीच्या माणसाला नीट झोप लागत नाही, आजारी माणसे आणि तान्ही बाळे अस्वस्थ होतात आणि जेथे अशा प्रकाराचा मोठ्या पट्टीतला आवाज सातत्याने येतो, तेथील लोकांना ऐन तारुण्याताही बहिरेपणा येतो, रक्तदाबाचे विकार जडतात, हृदयविकाराला तोंड द्यावे लागते आणि आणखीन काही ना काही व्याधी जडतात. हे सर्व पाहून एक डॉक्टर आपले चांगले चाललेले रुग्णालय बंद करून, केवळ ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठीच आयुष्य खर्ची घालतात, हे ऐकल्यास आपला विश्वास बसणार नाही. त्याच लढाईचे पुस्तक 'कॉम्बटिंग कॅकोफोनी' नावाने प्रकाशित करण्यात आले.

विलेपार्ल्यात राहणारे डॉ. यशवंत ओक यांनी आपले चांगले चालते रुग्णालय बंद केले आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन कायदे करून घेतले. आता आपल्याला रात्री १० ते सकाळी सहापर्यंत शांत झोप लागू शकते. या सगळ्या लढाईची कहाणी त्यांनी 'कॉम्बटिंग कॅकोफोनी' या पुस्तकात सविस्तरपणे मांडली आहे. माणूस एकदम शांततेच्या जागी जाऊन बसल्यास अस्वस्थ होतो. त्याला आवाजाची इतकी सवय झालेली असते, की तो जणू त्याच्याशिवाय राहूच शकत नाही. माणसे गमतीने सांगतात, की दादरला रेल्वेरुळालगत राहणाऱ्यांना रात्री दोन ते चार झोप येत नाही; कारण तेव्हा लोकल गाड्या आणि बाहेरगावी जाणाऱ्या गाड्यांची ये-जा बंद असते. बाकीच्या वेळेत ते ढाराढूर झोपू शकतात; कारण तो आवाज त्यांच्या रक्तात गेलेला असतो. रडणारे तान्हे मूल आईने छातीशी धरले, की रडायचे थांबते; कारण त्याला आईच्या हृदयाचे ठोके ऐकू येतात. आईच्या पोटात नऊ महिने असताना, त्याला त्या लयीची सवय झालेली असते.

सार्वजनिक ठिकाणी जीवघेणे आवाज कुठेकुठे होत असतात, याची यादी वाचल्यास नवल वाटेल. विमानतळ, कारखाने, घरे बांधण्याच्या जागी, वर्दळीच्या रस्त्यावरील वाहनांचे आवाज, समुद्रातील जहाजांची ये-जा, दिवाळीतील फटाके, गणेशोत्सव-नवरात्र-मोहरमच्या मिरवणुकी आणि दांडीया नाच, गावागावांत साजरे होणारे लग्न समारंभ, निवडणुका जिंकल्यावर निघणाऱ्या मिरवणुका, जत्रेतील देवांच्या पालख्या हे व असे अनेक. तरुणांना आवाजाची नशा असते; पण त्या काही तासांच्या मौजेची किंमत त्यांना आयुष्यभर द्यावी लागते, हे गावीही नसते.

# उद्घोष राष्ट्रीय स्वप्नांचा

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेले नववे भाषण होते. यंदा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असल्याने या सोहळ्याला; तसेच भाषणालाही वेगळे महत्त्व होते. '**

घरोघरी तिरंगा' ही मोहीम चालू करून मोदींनी यंदाचे वेगळेपण आधीच सूचित केले. ते वेगळेपण लाल किल्ल्याची खास सजावट, समोर भारताचा नकाशा केलेले प्रत्येक राज्यातील युवक-युवती आणि स्वत: मोदींचे व्यापक पटावरचे भाषण यांनी अधोरेखित केले. पंतप्रधानांच्या भाषणाचा पट मोठा असला, तरी त्याचा गोळीबंद सारांश काढायचा झाल्याल भविष्यातला 'राष्ट्रीय कार्यक्रम म्हणजे अजेंडा' आणि प्रत्येक भारतीयाचे अपेक्षित 'राष्ट्रीय चारित्र्य' या दोनच शब्दावलींमध्ये काढता येईल. अर्थात, कोणताही नेता मग ते लाल किल्यावर बोलणारे पंतप्रधान का असेना; त्यांच्या वागण्या-बोलण्याला एक राजकीय आंतरसंहिता, म्हणजे 'सबटेक्स्ट' असतेच. ती इतकी स्पष्ट होती, की भाषणानंतर काही तासांतच काँग्रेसच्या प्रभारी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी 'स्वातंत्र्य चळवळीचे सुमारीकरण केले जात' असल्याची टीका केली. राहुल गांधी यांनी कोणतीही प्रतिक्रिया न देता



केवळ सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या भाषणाला चिकटून येणाऱ्या राजकारणाचा विचार करावा लागेलच; मात्र त्या पलीकडे पंतप्रधान मांडत असलेले मुद्दे भारताच्या भविष्यातील वाटचालीला उपकारक होते की नाही, याचा वस्तुनिष्ठ परामर्श घेणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाच्या साह्याने थेट अनुदान पोहोचल्याने दोन लाख कोटी रुपयांचा गैरव्यवहार वाचल्याचा दावा मोदींनी केला. ही रक्कम मोठी आहे; मात्र आजही आपले सार्वजनिक जीवन व व्यवहार भ्रष्टाचारमुक्त झालेले नाहीत. त्यामुळेच त्यांनी त्याचा उल्लेख 'दीमक' म्हणजे वाळवी अशा शब्दात केला. तो खरा आहे. त्यांनी मांडलेला दुसरा मुद्दा घराणेशाहीचा. 'मी हे केवळ राजकारणासाठी बोलत नाही. सर्वच क्षेत्रांतील घराणेशाहीमुळे होतकरू तरुणांचा मनोभंग होतो. ते निराश होतात,' असे मोदी म्हणाले. हेही खरेच आहे. घराणेशाही म्हणजे केवळ कोणताही पक्ष किंवा संघटना ताब्यात ठेवणारे घराणे असा धरून चालणार नाही. हाती छोटी सत्ता आली, तरी ती आपल्याच घरात ठेवण्याची धडपड म्हणजे घराणेशाही. आपण लोकशाही जपली; मात्र देशभरातल्या साध्या खासगी विश्वस्त संस्था म्हणजे ट्रस्टचा विचार केला, तरी तेथे घराणेशाही कशी चालते, याची शेकडो उदाहरणे देता येतील. हेच धंद्यात. हेच उद्योगांमध्ये आणि तेच सार्वजनिक जीवनातील कलेसहित प्रत्येक क्षेत्रात. पंतप्रधानांनी खास उल्लेख केलेल्या स्त्रीशक्तीच्या सन्मानाच्या आड जशी काही वेळा भारतीय कुटुंबव्यवस्था येते; तशीच जिथे तिथे घराणेशाही चालविण्यातही याच कुटुंबसंस्थेचा मोठा वाटा आहे.

## ।। अभंगवाणी ।।




वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥
भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### ग्राम विकास अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ पकडले



।कोल्हापूर। महाईन्यूज।

सार्वजनिक शौचालय बांधकाम बांधकामाच्या देयकाची रक्कम मंजूर करण्यासाठी लाचेची रक्कम मागितल्या प्रकरणी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांना गुरुवारी रंगेहात पकडण्यात आले. याप्रकरणी कुई (तालुका करवीर) येथील ग्रामपंचायत सदस्य धनाजी पाटील ( वय ४६ ) व ग्रामसेवक महादेव गणपती डोंगळे (वय ५६) अशी कारवाई झालेल्या दोघा संशयित आरोपींची नावे आहेत. यातील तक्रारदार यांनी कुई गावी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम केले होते. त्याचे २ लाख ९९ हजार रुपयांचे देयक होते. त्यापैकी १ लाख ९७ हजार रुपये यापूर्वी त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले होते. उर्वरित रक्कम वर्ग करण्यासाठी धनाजी पाटील व महादेव डोंगळे यांनी देयकाच्या १० टक्के याप्रमाणे ३० हजार रुपये लाचेची मागणी केली होती.

# अतिवृष्टीग्रस्तांना साडेचार हजार कोटींची मदत!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची माहिती; राज्यात 20 हजार पोलिसांची भरती होणार

।मुंबई।महाईन्यूज।



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठक पार पडली. या बैठकीत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या ३६ लाख शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार नुकसानग्रस्तांना एकूण साडेचार हजार कोटींचे वाटप सुरू झाले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. राज्यात २० हजार पोलिसांची भरती होणार असल्याचेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. सततच्या पावसामुळे निकषांमध्ये न बसणाऱ्या ठिकाणांवरदेखील पंचनामे करण्यात आले आहेत. यानुसार सहा लाख शेतकऱ्यांना ७५५ कोटींची मदत करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. “एनडीआरएफच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना १५०० कोटींचे वाटप झाले असते, मात्र शिंदे-फडणवीस सरकारने साडेचार हजार कोटींचे वाटप केले” असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

‘पाकिस्तान जिंदाबाद’चे नारे देणाऱ्यांना माफ केले जाणार नाही. देशविरोधी कृत्य करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे यावेळी मुख्यमंत्री म्हणाले आहेत. दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना पुढे नेण्याची आमची भूमिका दसरा मेळाव्यात दिसेल, असेही शिंदेंनी म्हटले

# खुशखबर! मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर आरोग्य सेविकांचीही दिवाळी गोड!

## दिवाळी बोनसचा मुंबई महापालिकेच्या 93 हजार तर बेस्टच्या 29 हजार कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे

।मुंबई।महाईन्यूज।



मुंबई महापालिकेचे कर्मचारी, शिक्षक आणि बेस्ट बस कर्मचाऱ्यांना २२ हजार ५०० रुपयांचा दिवाळी बोनस जाहीर करण्यात आला आहे. आरोग्य सेविकांना एक पगार दिवाळी बोनस म्हणून दिला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. या निर्णयाचा मुंबई महापालिकेच्या ९३ हजार तर बेस्टच्या २९ हजार कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे.

मुंबई महापालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी तसेच अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोनसबाबत मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेत आज बैठक पार पडली. या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी ही महत्त्वाची घोषणा केली आहे. “करोनाच्या बिकट परिस्थितीत मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी चांगले काम केले.

विकास कामांवर खर्च केलाच पाहिजे, त्यासोबतच चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहनदेखील दिले पाहिजे”, असे या बैठकीत मुख्यमंत्री म्हणाले.

या बैठकीत चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना ‘श्रमसाफल्य’ आणि ‘आश्रय’ या योजनेतील घरे उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली. विविध विकास यंत्रणांना सोबत घेऊन अशी घरे मोठ्या संख्येने उपलब्ध व्हावीत, यासाठी स्वतंत्र समन्वय बैठक घेण्याचे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. या बैठकीला खासदार राहुल शेवाळे, मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांच्यासह पालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

# “२०२४ मध्ये महाविकासआघाडीला उमेदवारदेखील मिळणार नाही!

## चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधान, वैधानिक विकास महामंडळांवरुन टीका

।मुंबई। ।महाईन्यूज।

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती दौऱ्यावर असताना महाविकासआघाडीच्या सत्ताकाळातील कारभारावर टीका केली आहे. महाविकासआघाडीच्या काळात विकास रखडल्याने जनतेमध्ये चीड निर्माण झाली आहे. गावाखेड्यातील कार्यकर्ते महाविकासआघाडी आणि शिंदे-फडणवीस सरकारमधील विकासकामांची तुलना करत आहेत. यामुळे २०२४ मधील निवडणुकीत महाविकासआघाडीला उमेदवारदेखील मिळणार नाही, असे बावनकुळे म्हणाले आहेत.



“२०२४ जवळ येईल तेव्हा धक्के बसतील, खूप बॉम्बस्फोट होतील,” भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंचे विधान “मराठवाडा, विदर्भाचे वैधानिक विकास महामंडळे महाविकासआघाडी सरकारने बंद केले. त्यामुळे या प्रदेशाचा विकास रखडला आहे. मात्र, आता शिंदे-फडणवीस सरकारने वैधानिक मंडळांची स्थापना केल्यामुळे विकासाला गती मिळणार आहे”, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

**“२०२४ जवळ येईल तेव्हा धक्के बसतील, खूप बॉम्बस्फोट होतील,” भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंचे विधान “मराठवाडा, विदर्भाचे वैधानिक विकास महामंडळे महाविकासआघाडी सरकारने बंद केले. त्यामुळे या प्रदेशाचा विकास रखडला आहे. मात्र, आता शिंदे-फडणवीस सरकारने वैधानिक मंडळांची स्थापना केल्यामुळे विकासाला गती मिळणार आहे”, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.**

राज्यपालांनी १२ आमदारांची यादी मंजूर केल्यानंतरच वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात येईल, या तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या भूमिकेवरही यावेळी बावनकुळे यांनी हल्लाबोल केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रोजस १८-१८ तास काम करतात. मात्र, महाविकासआघाजी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे मंत्रालयातदेखील येत नव्हते. त्यामुळे या काळात काहाही काम झाले नसल्याचा आरोप बावनकुळे यांनी केला आहे. दरम्यान, आगामी निवडणुकीत विरोधकांना मोठ धक्के बसतील, असा इशारा बावनकुळे यांनी दिली आहे.

# गॅस सिलिंडरच्या वापरावर मर्यादा, सुप्रिया सुळेंचा मोदी सरकारवर निशाणा

।बोईसर।महाईन्यूज।



उज्वला गॅस योजनेतून ग्राहकांना केवळ १२ सिलिंडर देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. एकीकडे एलपीजी गॅस सिलिंडर दरात भरमसाठ वाढ करायची आणि दुसरीकडे गॅस सिलिंडर वापरावर मर्यादा आणायची, यातून केंद्र सरकारची असंवेदनशीलता दिसून येते, असे त्या म्हणाल्या. तसेच केंद्र सरकारची कार्यपद्धती कुचकामी असल्याची टीकाही त्यांनी केली आहे.“ऐन नवरात्रौत्सवात देशातील महिलांच्या हिताचा निर्णय घेण्याऐवजी मोदी सरकारने गृहिणींच्या चिंतेत आणखी भर घालण्याचं काम केले आहे. एकीकडे एलपीजी गॅस सिलिंडर दरात भरमसाठ वाढ करायची आणि दुसरीकडे गॅस सिलिंडर वापरावर मर्यादा आणायची, यातून केंद्र सरकार किती असंवेदनशील आहे हेच दिसून येतं”, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर केली आहे. “केंद्राच्या नव्या नियमानुसार उज्वला गॅस योजनेचा लाभार्थी नसलेल्या ग्राहकाला वर्षभरात केवळ १५ आणि अनुदानित असलेल्या ग्राहकाला १२ तर दोघांसाठीही महिन्याचा कोटा २ सिलिंडरचा करून मोदी सरकारने प्रत्येक गृहिणीच्या चिंतेत आणखी भर घातली आहे.

तर दुसरीकडे एखाद्या ग्राहकाला जर गॅस सिलिंडरची आवश्यकता असल्यास त्यासाठी गॅस सिलिंडर कंपनीच्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागेल. तसेच त्याचा पुरावा देऊन, त्यासाठी कागदपत्र सादर करून त्यानंतरच त्या ग्राहकाला अतिरिक्त रिफिल मिळू शकेल. केंद्र सरकारची कार्यपद्धती किती कुचकामी आहे हेच पाहायला मिळते”, असा घणाघात त्यांनी केला.

# ड्रग्स माफियांवर मोठी कारवाई!

## 175 जणांना अटक; इंटरपोलचाही मोहिमेत समावेश!

।पीटीआय
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

नुकतीच एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणा आणि ईडीनं देशभरात विविध ठिकाणी केलेल्या संयुक्त छापेमारीमध्ये पीएफआय या संघटनेवर मोठी कारवाई करण्यात आली. यानंतर आता पुन्हा एकदा देशातील तपास यंत्रणांनी केलेल्या एका मोठ्या संयुक्त कारवाईमध्ये देशातील ड्रग्स माफियांना मोठा झटका दिला आहे. सीबीआयनं या संपूर्ण मोहिमेचं नियोजन केलं होतं. 'ऑपरेशन गरुड' अंतर्गत देशभरात ही छापेमारी करण्यात आली. यामध्ये सीबीआयसोबत अंमली पदार्थविरोधी विभाग (NCB) आणि वेगवेगळ्या राज्यांच्या पोलीस दलाचाही समावेश होता. विशेष म्हणजे या मोहिमेत इंटरपोललाही सहभागी करण्यात आलं होतं. त्यामुळे हा ड्रग्स माफियांना मोठा झटका मानला जात आहे. गुरुवारी ऑपरेशन गरुडअंतर्गत तपास यंत्रणांनी देशभरात विविध ठिकाणी छापा टाकून तब्बल १७५ जणांना अटक केली आहे.




ईडीनं देशभरात विविध ठिकाणी केलेल्या संयुक्त छापेमारीमध्ये पीएफआय या संघटनेवर मोठी कारवाई करण्यात आली. यानंतर आता पुन्हा एकदा देशातील तपास यंत्रणांनी केलेल्या एका मोठ्या संयुक्त कारवाईमध्ये देशातील ड्रग्स माफियांना मोठा झटका दिला आहे. सीबीआयनं या संपूर्ण मोहिमेचं नियोजन केलं होतं. 'ऑपरेशन गरुड' अंतर्गत देशभरात ही छापेमारी करण्यात आली. यामध्ये सीबीआयसोबत अंमली पदार्थविरोधी विभाग (NCB) आणि वेगवेगळ्या राज्यांच्या पोलीस दलाचाही समावेश होता.

# अध्यक्षपदाच्या शर्यतीतून अशोक गेहलोत यांची माघार

## सोनिया गाधींची मागितली माफी

।जयपूर ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदावरुन काँग्रेस आमदारांनी केलेल्या बंडानंतर मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी आज दिल्लीत काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांची भेट घेतली. या भेटीनंतर काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढणार नसल्याचे गेहलोत यांनी स्पष्ट केले आहे. राजस्थानमध्ये निर्माण झालेल्या राजकीय संकटाबाबत सोनिया गांधींची माफी मागितल्याचे गेहलोत यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले आहे. राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदावर कायम राहणार की नाही, याबाबतचा निर्णय पक्षाध्यक्ष सोनिया गांधी घेतील, असे गेहलोत यांनी म्हटले आहे. मी काँग्रेसमध्ये एका प्रामाणिक सैनिकाप्रमाणे काम करत आहे. पक्ष नेतृत्वाने विश्वास दाखवून आजपर्यंत अनेक जबाबदाऱ्या दिल्या आहेत. काँग्रेस पक्षाचा एका ओळीचा प्रस्ताव मी पारित करू शकलो नाही, याचे दु:ख मला आयुष्यभर असेल. राजस्थानमध्ये घडलेल्या प्रकाराची मुख्यमंत्री म्हणून नैतिक जबाबदारी घेत मी सोनिया गांधींची माफी मागितली आहे", असे गेहलोत यांनी स्पष्ट केले आहे. काँग्रेस अध्यक्षपदासाठी अशोक गेहलोत यांच्या नावाला काँग्रेस नेतृत्वाची सर्वाधिक पसंती होती. मात्र, आता या शर्यतीतून गेहलोत यांनी माघार घेतली आहे. दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि

मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणूक रिंगणात उतरले आहेत. ते शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. काँग्रेस अध्यक्षपदासाठी दिग्विजय सिंह विरुद्ध शशी थरुर आमनेसामने येणार आहेत. काँग्रेसच्या अधिसूचनेनुसार, निवडणूक अर्ज भरण्याची प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. उमेदवारी अर्ज छाननीची तारीख १ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ८ ऑक्टोबर आहे.

# आसाममध्ये मोठी दुर्घटना : ३० जणांना घेऊन जाणारी बोट ब्रह्मपुत्रा नदीत उलटली

।नवी दिल्ली
। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आसाममध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. आज(गुरुवार) येथील धुबरी जिल्ह्यातील ब्रह्मपुत्रा नदी पात्रात जवळपास ३० जणांना घेऊन जाणारी बोट उलटली आहे. यामुळे अनेकजण बुडाले त्यापैकी सहा ते सातजण बेपत्ता अद्याप बेपत्ता आहेत, मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. अशी माहिती धुबरीचे उपायुक्त एम पी अनबामुथन यांनी दिली आहे.




या दुर्घटनेत धुबरी विभागीय अधिकारी संजू दासही बेपत्ता आहेत. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेंद्र देव त्रिपाठी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बचाव पथकाने नदीत बचावकार्य सुरू केले आहे. ज्यांना पोहता येत होते त्यांचा जीव वाचण्यात आला आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि सीमा सुरक्षा दलाच्या पथकांना शोध आणि बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आले आहे

# मोदींकडून सूरतमध्ये तब्बल ३४०० कोटींच्या प्रकल्पांचं उद्घाटन!

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून सूरतमध्ये त्यांनी तब्बल ३४०० कोटींच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन केलं आहे. यावेळी नरेंद्र मोदींच्या हस्ते यावेळी भूमीपूजन पार पडलं. गुजरातमध्ये ३६ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पार पडणार असून, नरेंद्र मोदींच्या हस्ते त्याचं उद्धाटन होणार आहे. गुजरातमध्ये पहिल्यांदाच ही स्पर्धा होत आहे. मोदींच्या स्वागतासाठी सूरतमध्ये लोकांची गर्दी झाली होती.

"गुजरातमध्ये डबल इंजिन सरकार आल्यानंतर घर बांधणीच्या कामाला वेग आला आहे. सूरतमधील मध्यमवर्गीय, गरीब लोकांनाही सुविधा मिळत आहेत. आयुष्यमान भारत योजनेच्या अंतर्गत देशातील चार कोटी रुग्णांना मोफत उपचार मिळाले आहेत. यामधील ३२ लाख गुजरात आणि १ लाख २५ हजार सूरतमधील आहेत," असं नरेंद्र मोदींनी यावेळी सांगितलं. पुढे ते म्हणाले की "नवरात्र साजरी होत असतानाच पायाभूत सुविधांचं भुमीपूजन, क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन करणं हे माझं भाग्य समजतो. सूरत हे एकतेचं उत्तम उदाहरण आहे. देशभरातील लोक सूरतमध्ये वास्तव्यास आहेत. ही मिनी-भारत आहे". पंतप्रधान नरेंद्र मोदी अहमदाबाद, गांधीनगर, सूरत, भावनगर आणि अंबाजी येथे भेट देणार आहेत. याठिकाणी अनेक विकास प्रकल्पांचं भुमीपूजन त्यांच्या हस्ते होणार असून लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

## "सूरत म्हणजे मिनी-भारत,



गुजरातमध्ये डिसेंबर महिन्यात विधानसभा निवडणुका पार पडणार असून त्याआधीच नरेंद्र मोदींचा हा नियोजित दौरा पार पडत आहे. गुजरातमध्ये गेल्या तीन दशकांपासून भाजपाचीच सत्ता आहे.

# प्रेम म्हणजे काय असतं' चित्रपटातून साताऱ्याच्या ऋतुजा टंकसाळेचं पदार्पण

## रिक्षा चालकाची मुलगी झाली अभिनेत्री : चित्रपट ४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला

पुणे : साताऱ्याची ऋतुजा टंकसाळे ही नवोदित अभिनेत्री "प्रेम म्हणजे काय असतं" या चित्रपटातून पदार्पण करत आहे.



नव्या दमाच्या कलाकारांनी केलेला 'प्रेम म्हणजे काय असतं' हा चित्रपट ४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. तख्त प्रॉडक्शनने 'प्रेम म्हणजे काय असतं' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर प्रसाद दत्तात्रय इंगवले यांनी चित्रपटाचं लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती अशी तिहेरी जबाबदारी निभावली आहे. प्रेम ही संकल्पना अत्यंत वेगळ्या पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात आली आहे. उत्तम कथा, फ्रेश कलाकार, श्रवणीय संगीताचा मिलाफ या चित्रपटात झाला आहे.ऋतुजा टंकसाळे ही साताऱ्याची तरुणी पहिल्यांदाच चित्रपटात अभिनय करत आहे. प्रेम म्हणजे काय असतं या चित्रपटात ऋतुजानं अपर्णा ही भूमिका केली आहे.ऋतुजाचे वडील रिक्षाचालक असून चित्रपटाची, अभिनयाची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या सर्वसामान्य कुटुंबातली ऋतुजा आपला पहिला चित्रपट प्रदर्शित होणार असल्यानं उत्साहात आहे. 'प्रेम म्हणजे काय असतं या चित्रपटातून मला खूप काही शिकायला मिळालं, चित्रपट हे माध्यम समजून घेता आलं. आता याच क्षेत्रात करिअर करायचं का हे ठरवलेलं नाही. पण संधी मिळाल्यास काम करायला नक्कीच आवडेल,' असं ऋतुजानं सांगितलं.

प्रेम म्हणजे काय असतं याचित्रपटातून निर्माते आणि दिग्दर्शकांनी अनेक नवोदित कलाकारांना या चित्रपटातून सुवर्ण संधी दिली असल्याने या चित्रपटातील कलाकारांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# सुबोध भावेच्या 'हर हर महादेव' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख ठरली! '

सुबोध भावेच्या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख ठरली.मराठी सिनेसृष्टीत अनेक ऐतिहासिक चित्रपट बनत आहेत. काही दिवसांपूर्वीच अभिजीत देशपांडे दिग्दर्शित आणि झी स्टुडिओची निर्मिती असलेला 'हर हर महादेव' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. या चित्रपटात मराठीतील हरहुन्नरी आणि बहुआयामी अभिनेता अशी ओळख असलेला सुबोध भावे छत्रपती शिवरायांच्या भूमिकेत दिसणार आहे.

छत्रपती शिवरायांच्या कार्याची ख्याती आणि कीर्ती ही केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशभर पसरलेली आहे. देशभरातील लोकांसाठी आजही छत्रपती शिवाजी महाराज हे प्रेरणास्रोत आहेत. हीच बाब लक्षात घेऊन या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपतींचं कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावं या उद्देशाने हा भव्य दिव्य चित्रपट साकारला जात आहे. या चित्रपटाचे पोस्टर आणि टीझर लाँच करण्यात आले होते. त्यानंतर आता चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही ठरली आहे.



अभिनेत्री सायली संजीवने याबाबत इन्स्टाग्राम पोस्ट करून माहिती दिली आहे. "आता अभिमानाने मोठ्या पडदयावर 'हर हर महादेव' ही शिवगर्जना घुमणार, पहिल्यांदाच मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू आणि कन्नड या ५ भाषांमधून, येत्या दिवाळीत २५ ऑक्टोबरपासून संपूर्ण देशात चित्रपटगृहात प्रदर्शित होणार," असं सायलीने पोस्टमध्ये म्हटलंय. यावेळी तिने चित्रपटाचे विविध भाषांमधील पोस्टरदेखील शेअर केले आहेत.



# आता फक्त अभिनयच नाही तर 'या' चित्रपटाची निर्मिती देखील करणार करिना

बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर खानचा नुकत्याच काही दिवसांपूर्वी 'लाल सिंह चड्ढा' चित्रपट प्रदर्शित झाला होता. सोशल मीडियावर या चित्रपटाला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आलं होतं. शिवाय बॉक्स ऑफिसवर देखील हा चित्रपट अपयशी ठरला. दरम्यान, येत्या काळात करीना नव्या चित्रपटामध्ये झळकणार आहे. या चित्रपटामध्ये करीना फक्त अभिनयचं नाही तर या चित्रपटाची निर्मिती देखील करणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन हंसल मेहता करणार असून हा क्राईम थ्रिलरवर आधारित असणार आहे. मात्र, अद्याप या चित्रपटाचे नाव फायनल झालेलं नाही.

# आतूर' फेम अभिनेत्री प्रीती मल्लापूरकरचं नवरात्रीनिमित्त दुर्गा अवतारात खास फोटोशूट!



शारदीय नवरात्रौत्सवाला यंदा 26 सप्टेंबरपासून सुरुवात झाली असून सोमवारी देवीच्या मंदिरात पारंपरिक पद्धतीने पूजा करुन घटस्थापना करण्यात आली. तब्बल दोन वर्ष कोरोनाच्या सावटामुळे राज्यभरात नवरात्रोत्सव जल्लोषात साजरा केला नव्हता. यंदा मात्र कोरोनाचं सावट नसल्याने पुन्हा पूर्वीच्याच जल्लोषात आणि आनंदात नवरात्रौत्सव साजरा करता येत आहे. याच निमित्ताने ईश्वरी चित्रपटातून मराठी चित्रपटविश्वात पुन्हा पदार्पण करणाऱ्या अभिनेत्री प्रीती मल्लापूरकरने दुर्गा अवतारात केलेलं खास फोटोशूट प्रचंड व्हायरल होत आहे.

नवरात्रीच्या निमित्तानं आपण अनेक अभिनेत्रींना देवीच्या वेगवेगळ्या वेशात फोटोशूट केलेलं पाहिलं आहे. यातच आता अभिनेत्री प्रीती मल्लापूरकरचं नाव देखील सामिल झालं आहे. हातात त्रिशूळ, लाल साडी आणि तोंडावर चंडीकेप्रमाणे दिसत असलेला रौद्रावतार असलेले हे फोटो पाहाताना तुम्हाला साक्षात देवीचं रूप पाहिल्याचा साक्षात्कार होईल. अभिनेत्री प्रीती मल्लापूरकर आवाहानात्मक भूमिका साकारण्यासाठी प्रसिद्ध आहे. तिने ईश्वरी चित्रपटात केलेली मुकबधीर मुलीची भूमिका विशेष ठरली. आगामी काळात राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील यांच्या 'आतूर' या सिनेमातून प्रीती आपल्या अभिनयाची जादू पसरवताना दिसरणार आहे. या सिनेमात प्रीतीसह अभिनेता चिन्मय उदगीरकर, योगश सोमण, प्रणव रावराणे आणि अभिनेत्री रश्मिता शहापूरकर, मुक्ता पटवर्धन यांची भूमिका पाहायला मिळणार आहे. लवकरच ह्या सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शोमध्ये रणवीर आणि दीपिकाचा वेगळाच अंदाज पाहायला मिळाला होता.

# दुनियादारी : कानातलं आणि मनातलं

"काय मग, आता पुढचं तुझं ना?"

"कधी देणार मग आम्हाला बुंदीचे लाडू?"

"लवकर योग्य वयात करून घे!"

ह्या सगळ्या प्रश्नांना आणि सल्ल्यांना डॉज करत वल्लभ त्याच्या मैत्रिणीच्या लग्नात इकडून तिकडे वावरत होता. त्याच लग्नात साधारण अशाच काही प्रश्नांना डॉज करत अवंतिकाही वावरत होती. दोघंही एकमेकांना ओळखत होते, पण ओळख नुसत्या ओळखीपेक्षा जरा जास्तीची असल्यानं त्यात लग्नाच्या माहोलाचा आणि आजूबाजूच्या लोकांच्या उपस्थितीचा एक ऑकवर्डनेस होता. आल्या




आल्या केलेलं "हाय" आणि नंतर वल्लभनं २-३ वेळा काहीतरी बोलायला सुरू केलेला विषय त्यांच्यात कोण ना कोण ओळखीचं बोलायला आल्यानं क्षणातच संपला होता. आता दोघंही नुसते गर्दीतून सारखे

एकमेकांच्या नजरेला नजर मिळवत स्वतःला आणखी थोडं ऑकवर्ड करण्याच्या शर्यतीत एकमेकांविरुद्ध आघाडी घेत होते. "कमीत कमी जेवण तरी मनसोक्त करू," असं मनातल्या मनात म्हणत वल्लभ बुफेच्या लायनीत लागतो. बासुंदी आहे का श्रीखंड, हे मान उंचावून बघत असताना वल्लभला तेवढ्यात तिची काळी इरकली साडी सांभाळत तिथं येणारी अवंतिका दिसते. तो पटकन मान परत जाग्यावर ठेवतो आणि एक छान स्माईल देत तीसुद्धा बुफेसाठी ताट हातात घेत त्याच्या मागे थांबते.

## शॉर्ट न्यूज »

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे भव्य उद्घाटन



।अहमदाबाद। महाईन्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुजरात येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे गुरुवारी भव्य उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय स्पर्धेसारख्या युवा क्रीडा उत्सवांमधून भावी ऑलिम्पिक पदकविजेते खेळाडू निर्माण होतील, असा विश्वास या उद्घाटन सोहळ्यादरम्यान पंतप्रधानांनी व्यक्त केला. मोटेरा येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या भव्य सोहळ्यात केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर, गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, भारतीय ऑलिम्पिक महासंघाचे महासचिव राजीव मेहता उपस्थित होते. त्यांच्यासह ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा, दोन ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू, नेमबाज गगन नारंग यांचीही या सोहळ्याला उपस्थिती होती. या सोहळ्यात गुजरातच्या संस्कृतीचे दर्शन करण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : महाराष्ट्राचे कबड्डी संघ उपांत्य फेरीत!

### महिला संघाने गटातील तीनही सामने जिंकले, तर पुरुष संघाला अखेरच्या साखळी सामन्यात सेनादलाकडून पराभव पत्करावा लागला

।अहमदाबाद । महाईन्यूज ।

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील कबड्डीत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. महिला संघाने गटातील तीनही सामने जिंकले, तर पुरुष संघाला अखेरच्या साखळी सामन्यात सेनादलाकडून पराभव पत्करावा लागला. महिला संघाने बुधवारी तिसऱ्या सामन्यात बिहारचे आव्हान ३६-२० असे परतवले. या सामन्यात विश्रांतीला महाराष्ट्राकडे १५-१४ अशी केवळ एका गुणाची आघाडी होती. उत्तरार्धात बदली खेळाडू म्हणून आलेल्या सायली केरिपाळेच्या बचावामुळे सामन्यात महाराष्ट्राने उचल घेतली आणि त्यानंतर पूजा यादवच्या अष्टपैलू खेळामुळे विजय मिळविला. पूजाने चढाई चमक दाखवताना बचावात पाच पकडीही केल्या. सोनाली शिंगटे, स्नेहल शिंदे यांच्या चढाया आणि अंकिता जाधवचा बचावही महाराष्ट्राच्या विजयात निर्णायक ठरला. उपांत्य फेरीत महाराष्ट्रासमोर तमिळनाडूचे आव्हान असेल. दुसऱ्या उपांत्य लढतीत हिमाचल प्रदेश-हरयाणा आमनेसामने येतील.

महाराष्ट्राच्या पुरुष संघाला अखेरच्या साखळी सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. सेनादलाने महाराष्ट्रावर ४८-३८ अशी मात केली. या पराभवामुळे महाराष्ट्रासमोर आता उपांत्य फेरीत बलाढ्य हरयाणाचे आव्हान असेल. दुसरी उपांत्य लढत सेनादल आणि उत्तर प्रदेश यांच्यात होईल.रग्बी सेव्हन्स प्रकारात महाराष्ट्राच्या महिला संघाने पहिल्याच दिवशी दोन विजयांची नोंद केली. महाराष्ट्राच्या महिला आणि पुरुष या दोन्ही संघांनी गुजरातचा धुव्वा उडवला.

#### पंतप्रधानांच्या हस्ते आज उद्घाटन सोहळा

टेबल टेनिस, कबड्डी आणि रग्बी खेळांच्या स्पर्धांना सुरुवात झाली असली, तरी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा अधिकृत उद्घाटन सोहळा आज, गुरुवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. या सोहळ्यात गुजरातच्या संस्कृतीचे दर्शन करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा, दोन ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू, नेमबाज गगन नारंग यांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगणार आहे.



### फिफा अंडर-१७ महिला फुटबॉल विश्वचषक

# इंडिया २०२२ स्पर्धेला ११ ऑक्टोबरपासून सुरुवात



। चेन्नई । महाईन्यूज ।

फिफा अंडर-१७ महिला विश्वचषक इंडिया येत्या ११ ते ३० ऑक्टोबर दरम्यान भुवनेश्वर, गोवा आणि महाराष्ट्रातील नवी मुंबई अशा तीन शहरात आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या तिकीट विक्रीचा प्रारंभ भारताचे केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री अनुराग ठाकूर, फिफाचे लिंडसे टारप्ले, माजी भारतीय कर्णधार सुनील छेत्री व आशालता देवी यांच्या उपस्थितीत पार पडला.

FIFA.COM/TICKETS या वेबसाईटवर फुटबॉल चाहत्यांना आपली जागा आरक्षित करता येणार आहे. यावेळी असंख्य फुटबॉल चाहते, प्रेक्षक आणि मान्यवर उपस्थित होते. जागतिक दर्जाच्या स्पर्धेचा भारतीय फुटबॉल क्षेत्रावर पर्यायाने या खेळावर होणाऱ्या सखोल परिणामांचा विचार करुन तळागाळातील महिला प्रशिक्षकांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांच्यात नेतृत्व गुण रुजवण्यासाठी 'प्रशिक्षक शिक्षण शिष्यवृत्ती कार्यक्रम' या उपक्रमाची सुरुवात याआधीच करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या १६ सत्रांमधून सुमारे ४०० महिला प्रशिक्षक तयार झाले आहेत. या निमित्ताने विविध उपक्रमांची माहिती देताना अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष व संयोजन समितीचे चेअरमन कल्याण चौबे म्हणाले की, फिफा अंडर-१७ वुमन्स विश्वचषक इंडिया २०२२ स्पर्धेचे आयोजन हा केवळ एक सन्मानक नसून आमच्यासाठी बहुमोल संधी आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही